**महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या**
**(जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६**

क्रमांक झेडपीआर १०९५/ सीआर-२४२२/०६ महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अाधिनियम पाच) याच्या कलम २७४ चे पोटकलम (२) चे खंड (दोन) व (तेरा) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (जागा राखून ठेवण्याची पध्दत) नियम, १९८५ आणि महाराष्ट्र पंचायत समित्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (जागा राखून ठेवण्याची पध्दत) नियम, १९८५ व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (महिलांसाठी फिरत्या क्रमाने जागा राखून ठेवण्याची पध्दत ) नियम १९९० अधिक्रमित करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे, हे नियम उक्त कलम २७४ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे यापूर्वी प्रसिध्द करण्यात आले होते :-

**१. संक्षिप्त नांव :-**

या नियमांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम ) नियम, १९९६ असे म्हणता येईल.

**२. व्याख्या :-**

संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेलतर, नियमात,-

(अ) अधिनियम म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१

(ब) निर्वाचक गण म्हणजे अधिनियमाच्या कलम ५८, पोट-कलम (१) च्या खंड (अ) अन्वये निश्चित केलेल्या निर्वाचक गण

(क) मतदार विभाग म्हणजे अधिनियमाच्या कलम १२ च्या पोट-कलम (१) अन्वये रचना केलेल्या एखाद्या जिल्हयाचा मतदार विभाग

(ड) लोकसंख्या म्हणजे अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (२० अ) मध्ये व्याख्या केलेली लोकसंख्या

(इ) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

**३. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने निश्चित करणे :-**

जिल्हा परिषदेच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीसाठी, निवडणुकीद्वारे भरावयाच्या एकूण जागांपैकी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांमधील

व्यक्तींकरीता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या अधिनियमाच्या कलम, १२ च्या पोट-कलम (२) मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग निश्चित करील.

स्पष्टीकरण- जागांची संख्या निश्चित करताना अर्धा किंवा त्यापेक्षा जास्त अपूर्णाक असल्यास ती एक पूर्ण जागा धरण्यात येईल आणि अर्ध्यापेक्षा कमी अपूर्णाक असल्यास तो विचारात घेतला जाणार नाही.

**४. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांच्या वाटपाची आणि चक्रानुक्रमाची पध्दत :-**

(१) नियम ३ नुसार, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या व्यक्तींकरीता राखून ठेवावयाच्या जागा या, ज्या मतदार विभागातील अशा जातंची किंवा यथास्थिती, जमातींची लोकसंख्या सर्वाधिक असेल अशा मतदार विभागापासून सुरुवात करुन मतदार विभागांमध्ये उतरत्या क्रमाने वाटून देण्यात येतील.

परंतु आणखी असे की, जेथे एखाद्या मतदार विभागातील अनुसूचित जातींची किंवा यथास्थिती, अनुसूचित जमातींची लोकसंख्या अशी असेल की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या दोन्ही प्रवर्गांसाठी तो मतदार विभाग आरक्षित होऊ शकेल, त्याबाबतीत असा मतदार विभाग अशा प्रवर्गांपैकी ज्याची लोकसंख्या जास्त असेल त्या प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात येईल आणि या प्रक्रियेत, उर्वरित प्रवर्गासाठी ज्या मतदार विभागात उतरत्या क्रमाने पुढील सर्वाधिक लोकसंख्या असेल, तिथे त्या प्रवर्गासाठी जागा राखून ठेवण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हयातील वेगवेगळया मतदार विभागांना फिरत्या पध्दतीने आरक्षण देईपर्यन्त, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींकरिता राखून ठेवलेल्या जागा या, अगोदरच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या मतदार विभागात अशा जाती किंवा, यथास्थिती, जमातींसाठी जागा राखून ठेवण्यात आलेल्या नसतील अशा मतदार विभागात पुढील निवडणुकींमध्ये फिरत्या ठेवण्यात येतील :

परंतु, अशा जाती किंवा जमातींच्या सदस्यांना शक्यतो जास्तीत जास्त गटांत प्रतिनिधीत्व मिळण्याच्या दृष्टीने कोणत्याही एका गटात एकापेक्षा जास्त जागा राखीव ठेवली जाणार नाही, अशा पध्दतीने मतदार विभागांमध्ये जागा फिरत्या ठेवता येतील.

**५. नागरिकांच्या मागासवर्गाकरिता राखून ठेवलेल्या जागांचे वाटप व चक्रानुक्रमाची पध्दत :-**

(१) नियम ३ नुसार नागरिकांच्या मागासवर्गाकरिता निश्चित केलेल्या जागा या सोडत काढून मतदार विभागात वाटण्यात येतील :

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जिल्हयातील मतदार विभागांपैकी प्रत्येकास फिरत्या पध्दतीने असे आरक्षण देईपर्यन्त पोट-नियम (३) नुसार नागरिकांच्या मागासवर्गाकरीता राखून ठेवलेल्या जागा या, अगोदरच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या मतदार

विभागात नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्यात आलेल्या नसतील अशा मतदार विभागात पुढील सार्वत्रिक निवडणुकांमध्ये फिरत्या ठेवण्यात येतील.

**६. महिलांकरिता राखून ठेवलेल्या जागांचे वाटप व चक्रानुक्रमाची पध्दत :-**

(१) नियम ३ नुसार, अनुसूचित जातींच्या, अनुसूचित जमातींच्या किंवा यथास्थिती, नागरिकांच्या मागासवर्गाच्या महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागांचे ज्या मतदार विभागात अशा जाती, जमाती किंवा नागरिकांच्या मागासवर्गाकरिता जागा राखून ठेवलेल्या असतील त्या मतदार विभागात सोडत काढून नियत वाटप करण्यात येईल :

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप झाल्यानंतर महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती, नागरिकांचा मागासगर्व यामधील महिलांव्यतिरिक्त) राखून ठेवलेल्या जागा या वेगवेगळया मतदार विभागात सोडत काढून वाटण्यात येतील.

परंतु, पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी सोडत काढताना सर्व मतदार विभागांना फिरत्या पध्दतीने आरक्षण देईपर्यन्त, अगोदरच्या निवडणुकीत ज्या मतदार विभागात अशा जागा राखून ठेवलेल्या असतील ते मतदार विभाग वगळण्यात येतील.

**७. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी राखूंन ठेवावयाच्या जागांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने निश्चित करणे :-**

पंचायत समितीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीकरीता, निवडणुकीद्वारे भरावयाच्या एकूण जागांपैकी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यामधील व्यक्तींकरिता राखून ठेवावयाचा जागांची संख्या, अधिनियमाच्या कलम ५८ च्या पोट-कलम (१-अ) मधील तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोग निश्चित करील.

स्पष्टीकरण - जागांची संख्या निश्चित करताना अर्धा किंवा त्यापेक्षा जास्त अपूर्णाक असल्यास ती एक पूर्ण जागा धरण्यात येईल आणि अर्ध्यापेक्षा कमी अपूर्णांक असल्यास तो विचारात घेतला जाणार नाही.

**८. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखीव असलेल्या जागांच्या वाटपाची आणि चक्रानुक्रमाची पध्दत :-**

(१) नियम ७ नुसार अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याकरीता राखून ठेवावयाच्या जागा या, ज्या निर्वाचक गणातील अशा जातीची किंवा यथास्थिती, जमातीची लोकसंख्या सार्वधिक असेल अशा निर्वाचक गणापासून सुरुवात करुन निर्वाचक गणांमध्ये उतरत्या क्रमाने वाटून देण्यात येतीलः

परंतु, वेगवेगळया निर्वाचक गणातील अनुसूचित जातींची किंवा यथास्थिती, अनुसूचित जमातींची लोकसंख्या समान असेल किंवा एखाद्या निर्वाचक गणात अनुसूचित जातींची आणि अनुसूचित

जमातींची लोकसंख्या समान असेल, त्याबाबतीत अशा निर्वाचक गणातील किंवा निर्वाचक गणातील जागांचे वाटप सोडत काढून करण्यात येईल.

परंतु, आणखी असे की, जेथे एखाद्या निर्वाचक गणातील अनुसूचित जातींची किंवा यथास्थिती, अनुसूचित जमातींची लोकसंख्या अशी असेल की, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या दोन्ही प्रवर्गासाठी तो निर्वाचक गण आरक्षित होऊ शकेल, त्याबाबतीत असा निर्वाचक गण अशा प्रवर्गांपैकी ज्यांची लोकसंख्या जास्त असेल त्या प्रवर्गासाठी राखून ठेवण्यात येईल, आणि या प्रक्रियेत, उर्वरित प्रवर्गासाठी ज्या निर्वाचक गणात उतरत्या क्रमाने पुढील सर्वाधिक लोकसंख्या असेल, तिथे जागा राखून ठेवण्यात येईल.

(२) पोट-नियम(१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हयातील वेगवेगळया निर्वाचक गणांना फिरत्या पध्दतीने आरक्षण देईपर्यन्त, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीकरिता राखून ठेवलेल्या जागा या, अगोदरच्या सार्वत्रिक निवडणूकीत ज्या निर्वाचक गणात अशा जाती किंवा यथास्थिती, जमातीसाठी जागा राखून ठेवण्यात आलेल्या नसतील, अशा निर्वाचक गणात पुढील निवडणुकांमध्ये फिरत्या ठेवण्यात येतील.

**९. नागरिकांच्या मागासवगार्करिता राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व चक्रानुक्रमांची पध्दत :-**

(१) नियम ७ नुसार नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींकरीता राखून ठेवलेल्या जागा निर्वाचक गणांना सोडत काढून वाटून देण्यात येतील :.

परंतु, सोडत काढताना अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींकरीता अगोदरच राखून ठेवलेल्या जागा वगळण्यात येतील.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हयातील निर्वाचक गणांपैकी प्रत्येकास फिरत्या पध्दतीने आरक्षण देई पर्यन्त, नियम ७ नुसार नागरिकांच्या मागासवर्गाकरिता राखून ठेवलेल्या जागा या, अगोदरच्या सार्वत्रिक निवडणुकीत ज्या निर्वाचक गणात नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्यात आलेल्या नसतील, अशा निर्वाचक गणांमध्ये पुढील सार्वत्रािक निवडणुकांमध्ये फिरत्या ठेवण्यात येतील.

**१०. महिलांकरिता राखून ठेवलेल्या जागांचे वाटप करण्याची व चक्रानुक्रमाची पध्दत:-**

(१) नियम ७ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरिकांचा मागासवर्ग यांमधील महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा या, ज्या निर्वाचक गणांमध्ये अशा जाती, जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग याकरिता राखून ठेवलेल्या असतील त्या निर्वाचक गणात सोडत काढून नेमून देंण्यात येतील.

परंतु, पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी सोडत काढताना, जागा राखून ठेवणे आवश्यक आहे अशा सर्व निर्वाचक गणांना फिरत्या पध्दतीने आरक्षण देईपर्यन्त, ज्या निर्वाचक गणात अशा जाती,

जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्गामधील महिलांकरिता अगोदरच्या निवडणुकीत जाता राखून ठेवण्यात आल्या असतील ते निर्वाचक गण वगळण्यात येतील.

(२) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गातील महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागांचे वाटप झाल्यानंतर महिलांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील महिलांव्यतिरिक्त) राखून ठेवलेल्या जागा या, वेगवेगळया निर्वाचक गणात सोडत काढून वाटण्यात येतील :

परंतु, पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी सोडत काढताना, सर्व निर्वाचक गणांना, फिरत्या पध्दतीने आरक्षण देईपर्यन्त, अगोदरच्या निवडणुकीत अशा जागा राखून ठेवल्या असतील, ते निर्वाचक गण वगळण्यात येतील.

**११. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांमधील राखीव जागांच्या संबंधात सोडत काढण्याची पध्दत:-**

राखीव जागांकरिता काढावयाची सोडत जिल्हाधिका-याकडून किंवा जिल्हाधिकारी प्राधिकृत करील अशा तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिका-याकडून आणि सोडत काढण्याची सूचना संबंधित जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कार्यालयामधील सूचनाफलकावर प्रसिध्द करावयाच्या सूचनेस प्रतिसाद म्हणून जे रहिवासी उपस्थित राहतील अशा संबंधित जिल्हा परिषदेच्या किंवा यथास्थिती, पंचायत समितीच्या रहिवाशांच्या उपस्थितीत काढण्यात येईल आणि सोडत काढण्याची सूचना जिल्हा परिषद किंवा यथास्थिती, पंचायत समिती क्षेत्रातील सर्वाधिक खपाच्या वर्तमानपत्रांपैकी एका वर्तमानपत्रात ती प्रसिध्द करण्यात येईल. या नोटीशीत सोडत काढण्याचे ठिकाण, तारीख व वेळ दर्शविण्यात येईल.